रविवार दि.०५ मे २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २४८
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

### आ.सुरेश धस यांचे उत्स्फूर्त स्वागत करून गावो गावी प्रचार सभेला प्रतिसाद

# एकाच दिवसात २५ गावात आ.सुरेश धस यांच्या प्रचार दौऱ्याचा झंजावात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**





बीड लोकसभा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ आमदार सुरेश धस हे सध्या आष्टी मतदारसंघात गाव,वाडी,वस्ती,तांडा इथपर्यंत मतदारांशी संवाद साधताना दिसत आहेत.याचाच एक भाग म्हणून शनिवारी पत्रकारांनी देखील आमदार सुरेश धस यांच्या दौऱ्यामध्ये सहभागी होत त्यांच्या दिनचर्याचा अनुभव घेतला.यामध्ये आमदार सुरेश धस हे गावातील प्रत्येक मतदारांशी संवाद साधताना पहावयास मिळत होते,तसेच सकाळी आठ वाजल्यापासून सुरू झालेला हा दौरा रात्री दहा वाजेपर्यंत अविरतपणे सुरू असल्याचे चित्र दिसून आले. यामध्ये गावो गावी आमदार सुरेश धस यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना पहावयास मिळत होता.
या वेळी आ.सुरेश धस यांच्या गावोगावी झालेल्या कॉर्नर बैठकीतून त्यांनी उपस्थित तरुणांना सरकारने दिलेल्या १० टक्के आरक्षण आणि त्याचा जी आर आपण वाचला पाहिजे असे आवाहन केले.जेणेकरून यातून आपल्याला किती फायदा होतो आहे हे लक्षात येईल.शिवाय विरोधक विनाकारण भाजपा सत्तेवर आले की घटना बदलणार अशी आरोही ठोकत आहेत.मात्र कुणी ही संविधान बदलू शकत नाही हे खात्रीने सांगू इच्छितो.असे म्हणत धस यांनी महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना जास्तीत जास्त मतदान करण्याचे आवाहन करत विनंती केली. दिवसभर शनिवारी साकत, लोणी (खुंटेफळ वा.), पिंपळा (काकडवाडी), सुंबेवाडी, ठोंबळसांगवी, हातोळण, पारोडी, खरडगव्हाण, सोलापूरवाडी, खुंटेफळ, वाहिरा,पिंपळगाव दाणी, मेहकरी, सराटेवडगाव,टाकळी (आ), शेरी खु.,शेरी बु(खाकाळवाडी), मांडवा,बेलगाव,बीडसांगवी (गणगेवाडी/कणसेवाडी), देसुर,चिंचाळा या गावांना गाव दौरा करत प्रचार केला.

पुढे बोलताना धस म्हणाले की,देशामध्ये पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी आपल्याला बीड लोकसभेच्या खासदारपदी विकासाभिमुख नेतृत्व असलेल्या पंकजा मुंडे यांना विराजमान करायचे आहे. विरोधकांच्या अफवांना बळी न पडता आणि त्यांच्या अफवांवर विश्वास न ठेवता ज्या पंकजा ताईनी पालकमंत्री असताना भरघोस निधी आपल्या मतदार संघाला उपलब्ध करून दिला,विविध योजना आपल्या मतदारसंघात राबविल्या गेल्या त्यामुळे अनेक विकास कामे या माध्यमातून राबविली गेली.अशा व्यक्तीला आपण मतदान केले पाहिजे.असे सांगत लोकशाहीत विनंती करून मतदान मागण्यासाठी आज आपल्याकडे आलो असल्याचे ही शेवटी धस म्हणाले. यावेळी कार्यक्रमाचे गटाचे नेते हनुमंत जंजिरे,माजी उपसभापती गोपाळ भाऊ रक्ताटे,माजी सरपंच रिंकू बेलेकर,सरपंच संदिप खाकाळ, बाळासाहेब वाघुले,सरपंच विकास अमृते, माजी सरपंच संदीप चौधरी, माजी उपसरपंच उद्धव ससाणे, युवा नेते संभाजी शेंडगे, सरपंच सुभाष माळी,देवा धुमाळ, अशोक मुटकुळे, संतोष मुटकुळे, सीताराम वीर, रावसाहेब मुटकूळे,झुंबर श्रीखंडे,भाजपा नेते कल्याण पोकळे, माजी सरपंच बन्सीभाऊ पोकळे, माजी पंचायत समिती सदस्य किरण पोकळे,उधोजक प्रविण वारे,सरपंच तात्यासाहेब शिंदे,माजी उपसरपंच संजय पोकळे,अमृत पोकळे,सरपंच नंदकिशोर करांडे, उपसरपंच सदाशिव गणगे,घनशाम नरोडे, माजी सरपंच जालिंदर बाप्पू नरोडे,माजी सरपंच बबन करांडे, संपत ढोबळे,प्रशांत घुमरे, रामभाऊ गणगे,बाबासाहेब पानतावणे, बाबासाहेब शिंदे, संदीप करांडे, सुभाष गणगे आदींसह सर्व गावा सर्व प्रचारादरम्यान गाव भेटीतील प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुव्यवस्था कायम:कायदा, सुव्यवस्थेसाठी आष्टीसह कडा, आंधळेवाडी गावात पोलिसांचा रुट मार्च

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**



देशात लागू असलेली आचारसंहिता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठीआष्टी शहरात किनारा चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक, कमानवेश,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,बसस्थानक, म.फुले चौक,महावीर चौक, असा पथसंचलन करण्यात आले तर कडा येथे डॉ.आंबेडकर चौक, अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक, कृषि उत्पन्न बाजार समिती, मेन बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बाजार स्थळ संग्राम चौक बसस्थानक असा रुटमार्च काढला तर अति संवेदनशील भाग म्हणून ओळख असणाऱ्या तालुक्यातील आंधळेवाडीत पोलिसांकडून पथसंचलन करण्यात आले आहे. नागरीकांनी कायदा व सुव्यवस्थेचे पालन करावे, निवडणूक काळात आदर्श आचारसंहितेचे पालन करावे असे आवाहन पोलिस निरिक्षक संतोष खेतमाळस यांनी केले. आष्टी तालुक्यात लोकसभा निवडणुकी निमित राजकीय वातावरण तापलेले असून या निवडणूका निर्विघ्न व शांततेत पार पडव्यात,म्हणून कडा, आंधळेवाडी आष्टी शहरात आष्टी पोलिसांकडून (रुटमार्च) पथसंचलन करण्यात आले. याप्रसंगी पो.नि संतोष खेतमाळस,स.पो.नि विक्रांत हिंगे,स.पो.नि विजय नरवडे, पो.उप.नि कृष्णा शिंदे,अजिनाथ काकडे यांच्यासह केंद्रीय रेल्वे पोलिस अधिकारी,आष्टी पोलिस ठाण्याचे कर्मचारी,दंगल नियंत्रक पथकाचे जवान मोठ्या संख्येने रूट मार्च मध्ये सहभागी झाले होते.

## आष्टी येथे होणाऱ्या शरदचंद्रजी पवार यांच्या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे-राम भाऊ खाडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



महाविकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या प्रचारार्थ सोमवार दिनांक ६ मे रोजी सकाळी ११ वाजता आष्टी येथील ईदगाह मैदान येथे मा शरदचंद्रजी पवार साहेब यांची जाहीर सभा होणार असून सर्वांनी या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरदचंद्रजी पवार गट) आष्टी विधानसभा अध्यक्ष राम खाडे यांनी केले आहे.बीड लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग (बप्पा) सोनवणे यांनी संपूर्ण जिल्हा पिंजून काढला असून सर्व सामान्य नागरिकांचा त्यांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे.सदरील निवडणूक ही जनतेने हातात घेतली असल्याने बजरंग सोनवणे यांचा विजय निश्चित झाला आहे. खासदार प्रीतम मुंडे यांच्या दहा वर्षाच्या काळात आष्टी मतदार संघात ग्रामीण भागात जनसंपर्क नसल्यामुळे जनतेत तीव्र नाराजी आहे.अहमदनगर बीड परळी रेल्वेचे स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचे रेल्वेचे स्वप्न आज ही अधुरेच राहिले असून सदरील रेल्वे ही अहमदनगर ते अमळनेर पर्यंत कधी येते तर कधी येत नाही.सदरील रेल्वे बीड व परळी पर्यंत कधी धावणार? का निवडणूक आली की रेल्वेचे गाजर दाखविले जाते.केंद्र सरकारच्या आरोग्यासाठी असलेल्या अनेक योजनांची अंमलबजावणी होत नसल्यामुळे रुग्णांची हॉस्पिटलमध्ये होणारे लूट होत आहे. यामुळे सर्वसामान्य जनतेत तीव्र नाराजी आहे.केंद्र व राज्य सरकारमध्ये समन्वय नसल्यामुळे सर्वसामान्य जनतेला कोणताही लाभ मिळत नाही. सध्या आष्टीचे तिन्ही आजी माजी आमदार विकासासाठी एकाच बाजूने असले तरी विकासाची गंगा कागदावरच असल्याचे दिसून येते.त्यामुळे आष्टी मतदार संघाचा विकास करण्यासाठी बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या प्रचारार्थ माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्रजी पवार साहेब,भूषणसिंह राजे होळकर यांची आष्टी येथे सोमवारी सकाळी ११ वाजता जाहीर सभा होणार आहे.या सभेस उपस्थित.महेबूब शेख आ.संदीप क्षीरसागर.जीवनराव गोरे.मा.आ सय्यद सलीम.मा आ साहेबराव दरेकर,मा आ उषा दराडे,मा.आ पुर्थ्वीराज साठे,मा आ बदामराव पंडित, मा आ राजेंद्र जगताप,सुशीला मोराळे,बबन गिते, शिवसेना जिल्हाप्रमुख (उबाठा),परमेश्वर सातपुते,अण्णासाहेब चौधरी, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख,रवि ढोबळे,मिलींद आव्हाड मानव हक्क अभियान चे राष्ट्रीय अध्यक्ष,ल इंडीया पँथर दिपक भाई केदार,डेमोक्ट्रीक पार्टी चे प्रदेश अध्यक्ष अजिंक्य चांगणे,अहमद पठाण ड.किशोर मुळे,सुनील नाथ, अमोल तरटे,आप चे अशोक येडे ऑल इंडिया पँथर जिल्हा अध्यक्ष उपस्थित राहणार आहे. तसेच आष्टी विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी,सर्वसामान्य नागरिक,शेतकरी,कष्टकरी तसेच कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राम खाडे यांनी केले आहे.

## कवडाशाह बाबाचा वार्षिक संदल मोठ्या उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम रजा**



उमरखेड आज रोजी उमरखेड शहरातील सुप्रसिद्ध देवस्थान हजरत कवडाशाह बाबा यांचे वार्षिक संदल अध्यक्ष शहादत खान यांच्या मार्गदर्शनात जल्लोषात साजरे झाले दर वर्षी प्रमाणे याही वर्षी यवतमाळ तालुक्यातील उमरखेड शहरात दयानंद कॉलनी मध्ये स्थित सर्व धर्मीय प्रिय संत कवडाशाह बाबा यांचे वार्षिक शोभा यात्रा आणि ऊर्स संपन्न झाले उमरखेड शहराला फाकिरांची वस्ती म्हणून संबोधले जातात या शहरात शेकडो मंदिर आणि दर्गा स्थापित आहे उमरखेड शहराचे जातीय सलोखा याच संत महात्मा बाबा यांच्या सावली खाली जिवंत आहे उमरखेड शहरात कवडाशाह बाबा रोड या नावाने रस्ता कायम आहे आणि कवडाशाह बाबा यांना मानणारे आणि त्यांचे वर श्रद्धा असणारे सर्वच समाजाचे लोक आहेत उमरखेड शहरात तीन आठवडी बाजार धर्म संस्थान यांच्या दरबारी भारतात यात कवडाशाह बाबा बाजार चे ही समावेश आहे एक महादेवाचे बाजार आणि दुसरे देवीचे बाजार आणि तिसरे कवडाशह बाबा यांचे बाजार या वर्षी ही आठवडी बाजार भरलेतसेच शुक्रवार रोजी बाबाची जियारत कार्यक्रम संपन्न झाला कवडा शाह बाबा यांची बैठक असलेली मौला अली चौक येथून पूजा अर्चना करून काढण्यात आली दर्गा ची शोभा यात्रा मौला अली चौकातून नाग चौक ते बस स्टँड समोरून संजय गांधी चौक पासून दर्गा वर जाऊन समापन झाले उमरखेड शहरात कवडाशह बाबा दर्गा चे वार्षिक संदल ची परंपरे नुसार बाबाची पहिली चादर हे पोलिस प्रशासन कडून चढविण्यात येते पोलिस स्टेशन चे ठाणेदार संजय साळुंके यांनी या वर्षी ही परंपरा पार पाडली शहरात संदल ची शोभा यात्रा मिरवणुक अती उत्साहात काढण्यात आली आणि शांतीपूर्वक संपन्न झाली या सर्व कार्यक्रमाचे आयोजन कवडा शाह बाबा दर्गा कमिटी ट्रस्ट चे अध्यक्ष शाहदत खान अहमद नूर खान यांच्या नेतृत्वात विविध सामाजिक आणि धर्मीक कार्यक्रम आयोजित करून यशस्वी करण्यात आले भाविक भक्तांचे सर्व सेवा करण्यात आली आणि शकडो नागरिकांनी बाबाचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले आणि कार्यक्रम साजरा करण्यात आला.

## विहामांडवा येथे पोलिसांचे पथसंचलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**विहामाडंवा । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विहामांडवा पोलिसांनी गावातून पथसंचलन केले.दुय्यम बाजार समितीपासून इंद्रानगर, संभाजी चौक, लक्ष्मी आई चौक, मुख्य बाजारपेठ मार्गे पोलिस चौकी असे हे पथसंचलन करण्यात आले. यामध्ये पाचोड पोलीस स्टेशन चे सपोनि. शरदचंद्र रोडगे, सहायक पोलिस उपनिरीक्षक राम बारहाते यांच्यासह कर्मचारी यांचा पथसंचलनात समावेश होता.




### मतदार जनजागृतीसाठी रेल्वे स्थानकावर दि. ६ ते ८ चित्रप्रदर्शन

**छत्रपती संभाजीनगर**–केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाअंतर्गत केंद्रीय संचार ब्युरो यांच्या वतीने सोमवार दि.६ पासून छत्रपतीसंभजीनगर रेल्वेस्थानक येथे मतदार जनजागृतीसाठी चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि.६ रोजी सकाळी ११ वाजता या प्रदर्शनास सुरुवात होणार आहे.

### चारोळी

**जीवन जगणे शिकूनी घ्यावे
संघर्षातही मग हसत जगावे
जीवन अमृत पीत रहावे
पान गळतानाही गीत सुचावे.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

# भोकरदन पोलिसांच्या वतीने दानापुर येथे रूट मार्च

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । शेख जफर**



लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दानापूर ता. भोकरदन येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते गावातील विविध मार्गांवर रूटमार्च काढण्यात आला. लोकसभेची निवडणूक शांततेत पार पडावी, अचारसंहितेचे उल्लंघन होवू नये यासाठी प्रशासनाच्या वतीने आवश्यक ती दक्षता घेतली जात आहे. याच धर्तीवर दानापूर गावातही रूटमार्च काढण्यात आला. यावेळी भोकरदन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी हिम्मतराव वैद्य, सहाय्यक पोलीस निरीक्षक भारत मुरलीधर काळे, पीएसआय आसमान शिंदे, पवन कुमार राजपूत सिंग, बिट जमादार शेख अख्तर सहित भोकरदन पोलीस स्टेशनची ४० कर्मचारीसहित सी. आर. एफ. चे ग्रुपलीडर युनूस मकबूल खान सहित त्यांचे सहित ४० जवानांनी प्रदर्शन केले.

संपादकीय

# अमेरिका-चीन संबंधांचे शीतयुद्ध

अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री ब्लिंकन हे गेल्या आठवड्यात चीनचा दौरा करून परतले. या दौऱ्यात त्यांनी चीनचे परराष्ट्रमंत्री आणि अध्यक्ष व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. महिन्याच्या सुरुवातीला अमेरिकेच्या वित्तमंत्री जॅनेट येलेन यांनीही चीनला भेट देऊन अनेक विषयांवर चर्चा केली. मागील वर्षी नोव्हेंबरमध्ये चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग हे सॅन फ्रान्सिस्को येथे अध्यक्ष जो बायडेन यांना भेटले होते. त्यानंतर दोन्ही देशांतील वरिष्ठ सैनिक आणि इतर अधिकाऱ्यांच्या भेटी, वार्ताविनिमय वाढलेले दिसतात; परंतु बहुतांश विषयाच्या वादांवर काहीच सहमती दिसत नाही. वर्षाअखेर जर डोनाल्ड ट्रम्प हे अध्यक्षपदी निवडून आले तर अमेरिका-चीन यांच्यातील संबंध अधिक जटिल होण्याची शक्यता आहे.सन २०२२पासून सुरू असलेल्या युक्रेन युद्धात आता रशियाचे पारडे जड होत आहे. हमास-इस्त्रायल युद्धाची रणधुमाळी अद्याप चालू आहे आणि गाझा पट्टीतील नागरिकांचे हाल वाढत असून त्यांना तूर्त दिलासाची आशा नाही. भर घालायला वर्षाच्या सुरुवातीला तैवान येथील अध्यक्षीय आणि सार्वत्रिक निवडणूकीत चीनला विरोध करणारे अध्यक्ष आणि पक्ष निवडून आल्याने तेथील तणाव कायम आहे. दक्षिण चीन उपसागरात चीनने आक्रमक धोरण चालू ठेवले असून चीन व फिलिपाइन्स यांच्यातील मतभेदाला नवीन वाचा फुटली आहे. प्रत्येक घटनेत अमेरिका आणि चीन विरोधी पक्षांना मदत पुरवत आहेत. याशिवाय अमेरिकेने चीनकडून होणाऱ्या आयातीवर निर्बंध लागू करून चीनला अत्याधुनिक तंत्रज्ञान निर्यात करण्यावर बंदी केली आहे. अमेरिकेचे म्हणणे आहे की, चीन त्यांच्याकडून आयात केलेल्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून अमेरिकी उत्पादनांशी स्पर्धा करत आहे ज्याचा विपरित परिणाम अमेरिकेच्या उद्यमांवर आणि अनुषंगाने रोजगारांवर होत आहे.रशियाने केलेल्या आक्रमणाचा सुरुवातीला अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांच्या मदतीने युक्रेनने चांगला प्रतिकार केला. परंतु अखेर रशियाच्या सामर्थ्यापुढे युक्रेनला हळूहळ झुकावे लागले आहे. मागील वर्षी हमासने इस्त्रायलवर गाझा पट्टीतून हल्ला करून सुरुवातीला यश मिळवले व त्याच्या प्रतिकारात इस्त्रायलला अमेरिकासह इतर मित्रदेशांनी अटीतटीची मदत केली. साहजिक युक्रेनला मिळणारी पाश्चिमात्य मदत घटली. दुसरीकडे चीनने रशियाला आधुनिक शस्त्रसामग्रीचा पुरवठा सुरू केला व त्याच्या बदली खनिज तेलाची स्वस्त दरावर आयात सुरू केली. आज रशिया आणि चीन यांच्यातील मैत्री आणि व्यापार वाढत आहे. याच्यात आक्षेपार्ह काहीच नाही. रशियाच्या खनिज तेलावर निर्बंध असले तरी नियमांत पळवाट काढून भारतही तेल आयात करतो व आपल्या पश्चिमी तटावरील रिफायनरीत प्रक्रिया करून पाश्चिमात्य देशांना निर्यात करतो. रशिया आणि चीन यांच्या मैत्रीतील आक्षेपार्ह पैलू म्हणजे रशियाची इराणला होणारी मदत; ज्यात इराणच्या आण्विक प्रकल्पाला पाश्चिमात्य निर्बंध डावलून मदत होत असल्याचा आरोप केला जातो.तिकडे, इतके महिने वेगवेगळ्या प्रकारची अत्याधुनिक शस्त्रसामग्री वापरून गाझा पट्टी जमीनदोस्त केल्यानंतर आणि तेथील नागरिकांचे जीवन असह्य करूनही इस्त्रायल हमासचे अस्तित्व मिटवण्यात अपयशी ठरले आहे. इस्त्रायलने आता जगाची सहानुभूती गमावली असून उलट युद्धक्षेत्राचा विस्तार वाढत आहे. लेबनॉनस्थित हेजबुल्लाह, सीरीया आणि इराकमध्ये आश्रय घेतलेले आयएसचे दहशतवादी, पर्शियन आखातात सक्रीय असलेले येमेनमधील हुथी बंडखोर हे इराणचे शत्रू. या पार्श्वभूमीवर एप्रिलच्या सुरुवातीला इस्त्रायलने दमास्कसमधील इराणच्या दूतावासातील एक इमारत नष्ट केली. त्यात इराणच्या रेव्होल्युशनरी गार्डच्या अल-कुद्स या दहशतवाद्यांच्या कारवायांचे समन्वय करण्याच्या संस्थेचे वरिष्ठ सैनिकी अधिकारी ठार झाले. परराष्ट्र संबंधांचे शिष्टाचार आणि कूटनीतिक अधिकारांचे यात उल्लंघन झाले. इराणने याचा प्रतिकार करत इस्त्रायलवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोन यांचा हल्ला केला. संरक्षणासाठी इस्त्रायलला अमेरिका, ब्रिटन आणि (अरब) जॉर्डनची मदत घ्यावी लागली. इराणने तूर्त प्रकरण वाढू दिले नाही परंतु असे धाडस करण्यामागे त्यांचा सुरक्षेने वेढलेला आण्विक प्रकल्प आहे. पश्चिम आशियात इस्त्रायल आणि इराण अघोषित अणुसत्ता आहेत. इस्त्रायलला पाश्चिमात्य देशांचा पाठिंबा, तर इराणला रशिया आणि (काहींच्या मते) चीनचाही पाठिंबा आहे. अमेरिका चीनवर निर्बंध लावून वरिष्ठ स्तरावर करीत असलेल्या वाटाघाटींमागे हे महत्त्वाचे कारण आहे.आशिया-प्रशांत सागर क्षेत्रातील समस्या वेगळी आहे. तैवान हा चीनचा अविभाज्य भाग आहे, ही चीनची पहिल्यापासून भूमिका आहे. अमेरिकेने तैवानला संरक्षणाची हमी दिली आहे. दक्षिण चीन उपसागरात चीनने उभारलेली कृत्रिम बेटे आणि रहदारी करण्यावर लावलेले निर्बंध अमेरिका आणि मित्रदेश पाळत नाही. अमेरिकेच्या बलाढ्य विमानवाहक युद्धनौका आणि त्यांच्या संरक्षक काफिल्यांवर सशस्त्र कारवाईची क्षमता अजूनतरी चीनकडे नाही. मात्र, असे करणे हे अमेरिकेचे आपल्या सार्वभौमत्वावर अतिक्रमण आहे, ही चीनची जुनी तक्रार आहे. करोनाची साथ आटोक्यात ठेवण्यासाठी चीनने केलेल्या कडक आणि अवाजवी उपायांमुळे त्या देशाची अर्थव्यवस्था तुलनेने क्षीण झाली. त्याचे वेगळेच सामजिक आणि आर्थिक परिणाम सामान्य नागरिकांना आजही सोसावे लागत आहेत. अमेरिकेच्या पुढाकाराने पाश्चिमात्य देशांनी आयात-निर्यातीवर लावलेल्या निर्बंधांमुळे चीनची आणखी कोंडी झाली आहे. आज जर चीनचे मित्रदेश पाहिले तर त्यात रशिया, इराण आणि उत्तर कोरिया यांच्यासह पाकिस्तानसारखे देश आहेत. जगभर कर्ज शोधणाऱ्या पाकिस्तानने हल्लीच इराणचे परराष्ट्रमंत्री इब्राहिम रईसी यांचे स्वागत केले होते; परंतु त्याला लगेच अमेरिकेने विरोध केला व पाकिस्तान पुन्हा असे सहजासहजी करणार नाही. चीनकडून अधिक कर्ज घेण्यासाठी पाकिस्तान व्यावहारिक कारणांसाठी तयार नाही, परंतु तो विषय वेगळा आहे. सारांशात, चीनला अनेक आघाड्यांवर विरोध होत आहे आणि अमेरिकेच्या तक्रारींची यादी कमी नाही म्हणून अमेरिकी वरिष्ठ अधिकारी चीनशी चर्चा करत आहेत. अमेरिकेत सध्या फेंटानिल या मादक पदार्थाने तरुण पिढीवर पकड घेतली आहे. त्याचे मूळ पदार्थ चीनमधून निर्यात होत असून, त्यावर चीनने नियंत्रण ठेवावे, अशी अमेरिकेची मागणी आहे. याशिवाय चीनच्या वायव्य शीकियांग प्रांतात मुस्लिम नागरिकांच्या मानवाधिकारांचे उल्लंघन, पर्यावरण संरक्षणासाठी निधीचा हातभार अशा अमेरिकेच्या अनेक मागण्या आहेत व सर्वांवर येत्या अध्यक्षीय निवडणुकीच्या निकालाचे सावट आहे. डोनाल्ड ट्रम्प हे जरी आज कोर्टकचेरीत अडकलेले असले तरी त्यांची जिंकण्याची शक्यता नाकारता येत नाही. आणि ते निवडून आले तर त्यांचे चीनविरुद्ध धोरण आत्तापेक्षा कितीतरी पटीने कडक असेल.भारताची यात काय भूमिका आहे व काय धोरण असावे? चीनशी आपला व्यापार वाढत असला तरी निर्यातीपेक्षा आयात अधिक आहे म्हणजे हे चीनच्या फायद्याचे आहे. आपल्या उत्तर आणि ईशान्य सीमेवर वातावरण अजूनही तणावपूर्ण आहे; त्यामुळे भारताला सावध राहून सज्ज राहण्याशिवाय पर्याय नाही. चीनविरोधी संघटनांत सर्व संबंधित देश भारताच्या सहभागासाठी प्रयत्न करतील; परंतु आपले हित आपल्याला सांभाळायचे आहे. परिस्थिती कधीही बदलू शकते आणि आपण सर्व पर्यायांसाठी मार्ग खुले ठेवायला हवेत. परराष्ट्र संबंधांत शत्रू आणि मित्र हे तात्पुरते असतात; देशहित प्रमुख असते हे नेहमी लक्षात ठेवायला पाहिजे.

## पालकांनो मुलांना नीट नीटच करू द्या

# तुमच्या स्वप्नांचे ओझे झेलायला ते पाळलेले गाढव नाहीत

**लोकनेता न्युज नेटवर्क**

सर्व प्रथम आज नीट ची परीक्षा देत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना मनःपूर्वक शूभेच्छा. या परीक्षेत आपण सर्वांनी यश संपादन करून यशाच्या शिखरावर पोहचण्यासाठी यशस्वी पर्यंत करायचे आहे.

जगातील प्रत्येक व्यक्ती आपल्या आयुष्यात काहीना काही उद्योग सुरू ठेवत असतो. मग काही जन जमेल तो व्यवसाय करतात, काही जण कुठे तरी नौकरी करतात. जमेल त्यापरीने सर्व जण आपल्या जीवनाचे चक्र सुरू ठेवत असतो. जन्माला आलेल्या प्रत्येकाला या चक्रयुद्धास सामोरे जावे लागणारच आहे. पुढे काय? हा सर्वत्र आणि सर्वांना विचारल्या जाणारा प्रश्न. दहावी शिकलात पुढे काय.बारावी शिकलात पुढे काय हाच प्रश्न अनेकांना विचारला जातो. पण पुढे काहीच नाही का? की शिकून केवळ गुलाम होणे हाच आपल्या जीवनाचा प्रवास आहे का ? असे असेल तर मग पुढे काय पुढे काय म्हणत आयुष्य संपून जाईल आणि आपल्याला जे साध्य करायचं ते राहून जाईल. आज अनेक पालक आहेत जे की त्याचं स्वप्न इंजिनियर डॉक्टर बनण्याच होत पण बनू शकले नाही किंबहुना त्यांच्या कडून ते साध्य झालं नाही. मग तेच स्वप्न तुम्ही तुमच्या मुलांवर लाधनार का हे कितपत योग्य आपण सांगा. गेल्या अनेक वर्षांपासून आपण बघत आलोय अनुभवी लोकांना प्राधान्य देण्यात येत. मग केवळ शिकत राहील तर होईल का. तुम्ही मुलांना नीट, जे ई ई ला घालू नका या मताचा मी नाहीच हे किंवा कोणीही नसेल, परंतु आपल्या मुलांना कशात आवड आहे हे आपण लक्षात घ्यायला हवं. जिथे आवड असेल तिथे जाऊ द्या त्यांना त्यांच्या स्वप्नात रमु द्या. तुमच्या स्वप्नांचे ओझे त्यांना वाहायला लाऊ नका. कोटा मध्ये सॉरी पप्पा म्हणत परत एकदा एका मुलाने आयुष्य संपवले. केवळ एका राज्यात नव्हे तर देशात कोटा नीट साठी सुप्रसिद्ध आहे. अस असल तरी २०२३ मध्ये येथे २६ जणांनी आयुष्य संपवले. आपल्या जवळच असलेली छत्रपती संभाजी नगर येथे सुद्धा काही विद्यार्थ्यांनी संतापून आपले आयुष्य अर्ध्यातच सोडून दिले. का? तर फक्त अभ्यास होत नाही दोन तीन वेळा रिपीट करून सुद्धा झाल नाही. यावेळेस सुद्धा होणार नाही या भीतीने आपलं आयुष्य त्यांनी संपवलं. सर्वांना आपले एक आयुष्य जगण्याचे आयुष्य आहे. त्यामुळे मुलांना त्यांच्या मनाने त्यांचं आयुष्य जगू द्या त्यांना ज्या गोष्टीं करायच्या करू द्या. कुणाला छायाचित्रकार होयच, कुणाला कुठे आपलं शॉप टाकायचं, कुणाला एखादा उद्योग सुरू करायचा हे ही आयुष्यातील यशस्वी होण्याचे मार्ग आहेत. केवळ नीटच हा एक मार्ग नाही. हल्ली ते क्लासेस वाले शहराच्या गल्लो गलित त्यांची दुकाने मांडून बसलीत पण शंभर टक्के निकाल दाखवणाऱ्या कोणत्याही संचालकाने मुलांना विचारलं नसेल की इथे स्व इच्छेने किती जण आलात किती जण स्वतः साठी नीट देताय. की घरच्यांनी पाठवल म्हणून सुरू आहे. अस म्हणारे कोणीही बघायला मिळणार नाही या उलट एखादा विद्यार्थी उद्योगात उतरण्याचे स्वप्न ठेवत असेल तर पालकांना फितवून नीट करायला लावा असेल संचालक बघायला बोलतील. पण पालकांनी ही बाब लक्षात घेऊन आपल्या मुलांना नक्कीच स्वतःच्या इच्छेने जगू द्यायला हवं त्यांचं करिअर करू द्यायला हवं तुमच्या स्वप्नांचे ओझे वाहायला ते काय गाढव नाहीत.र तुम्ही सांगत आहात आणि त्यांचे नीट हेच जग आहे हा त्यांच्या मनावर विकृत संदेश रुजता कामा नाही. मित्रांनो हल्ली तुम्हाला पालकांनी कितीही अभ्यास करण्यासाठी प्रवृत्त केलं असेल. त्यात तुम्ही तुमचे संपूर्ण ताकतीने बुद्धीने प्रयत्न केले असेल तरी मार्क आले नाहीत तर. शक्य असल्यास रिपीट करा. नसेल शक्य तर शांत डोक्यांनी विचार करा आपल्याला काय जमेल ये आणि मग पूर्ण शक्ती एकवटून तयारीला लागा. आणि विजयाचा जल्लोष करूनच दाखवा. भलेही नीट देऊन डॉक्टर नाही झालात तरी चालेल पण आयुष्य हे खूप कोणती आहे . आणि ते आपल्याला आनंदने जगायचे आहे..

पुनश्च सर्वांना नीट पेपर साठी खूप साऱ्या शुभेच्छा..!!



**ज्ञानेश्वर बुधवत**
मुख्यसंपादक दैनिक लोकनेता
मातृ तीर्थ सिंदखेड राजा

**टिका नव्हे टिपणी (जनहितास्तव) भाग ३**

# गाडी सावकाश चालवू: गावी सुखरूप पोहचू!

आज प्रत्येकाच्या मुखातून हे शब्द बाहेर पडताना दिसतात, की सद्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. म्हणूनच की काय? आजचा युवकवर्ग पुढच्यास ओलांडून त्याच्या कितीतरी पुढे निघून जाण्याच्या नादात- ओव्हर टेक करण्याच्या प्रयत्नात सदासर्वकाळ दिसून येतो. यातच तो आनंद मानतो, हेच आपले ध्येय समजतो. मग तो जीवनमार्ग असू द्या किंवा वर्दळीचा राष्ट्रीयमार्ग तथा आंतरराष्ट्रीय महामार्ग असू द्या. आपलाच एक बांधव आहे, आपल्यासारखाच एक मानव आहे, अशी कदाचित त्याला कल्पना किंवा बुद्धीच उमगत नसावी. असे ते ओव्हर टेकचे भयान नाट्य बघून वाटते. बरं, एकाने ओव्हर टेक केले, म्हणून दुसरा तरी शांत व आपल्या चालीने- वेगाने मार्गक्रमण असतो का? नाही. त्याला पण चेव येतो, त्याची तीव्रपणे चेतना जागृत होते. मग तो चिडून त्वेषाने इरेस पेटतो आणि आपणही त्याला मागे पाडावे, म्हणून तो गाडी अतिवेगान दामटू लागतो. कारण हम भी किसीसे कम नही! हाच त्याचा स्वाभिमानी हेका असतो, तोरा असतो. परंतु त्याला हे कळत नाही, कि जाऊ दे बिचाऱ्याला! तो अंत्यत तातडीच्या कामात असेल. त्या ओव्हर टेकरची गाडी अधिक बलशाही व नवीन, कोरी करकरीत असेल. जाऊया आपण आपल्या नित्य चालीने. ओव्हर टेकरला मात्र ही सवय नित्याचीच होऊन जडलेली असते. कुठल्याच कामात तो मागे राहू इच्छित नाही. यातून त्यास खुप मोठा आनंद मिळत असावा, मात्र तो क्षणिक आणि आसुरी आनंद असतो. तो शाश्वत आनंद, ब्रह्मानंद मुळीच नसतो, हे मात्र नक्की! असेही त्याला वाटते, की आपण फार मोठे पराक्रमी वीर आहोत, म्हणून सदैव सैनिका पुढेच जायचे! या तोऱ्यात तो मिरवत फिरतो. किंवा नुसतीच त्याला मिरवायचे असते की आपण किती कार्यतत्पर आहोत. आपली कामाची उरक लोकांच्या डोळ्यांत त्वरेने भरण्याची घाई त्याला झालेली असते. जशी आपल्याकडे झाडीबोलीतील एक म्हण प्रसिद्ध आहे तशी-

येलपाडीचे (मिजासखोर स्त्रीचे) आले डोळे।
खाटले ठेवून खाल्या लोळे।।

ज्ञानवंतांनी भुकेल्या, तहानलेल्या, अधाशी, हपापलेल्या व्यक्तीस पुढ्यात घेऊन त्याची इच्छा पूर्ण केली पाहिजे. त्याच्यासारखेच ज्ञानवंतही करू लागले तर त्यांच्यातील फरकच कळणार नाही. म्हणून ज्ञानवंतांनी संयम, सबुरी व धीरानेच अशा प्रसंगाना सामोरे जाणे इष्ट ठरते. एकदा एका बाइकस्वाराने ओव्हर टेक केला. तेव्हा मागे पडलेला बाइकस्वार त्वेषाने पेटून उठला व बाइक वेगात दामटली. अतिवेगामुळे वळणावर ती घसरली आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या दगडावर जोरात आपटली. तिचा चेंदामेंदा झाला, तर बाइकस्वाराने मात्र या जगाचा कायमचा निरोप घेतला. दुसरी एक घटना अशी, की चार चाकी कारला एका बाइकस्वार युवकाने ओव्हर टेक करून मागे टाकले आणि तो शहरातील मुख्य चौकात येऊन काहीतरी खरेदी करू लागला. तेवढ्यात ती कार येऊन पोहोचली. कारचालक युवती त्याला आडवी झाली. मला ओव्हर टेक करण्याची तुझी हिंमतच कशी झाली? म्हणत आधी त्याच्या गालांगालावर मोजले आणि मग त्याला चांगलेच बदडून काढले. असा आपल्याला ओव्हर टेक केल्याचा वचपा, बदला घेतला. किती मोठ्ठा आनंद, परमानंद झाला असेल तिला! नाही काहो? तरीही बिच्चारा युवक शांतच! अशा या भानगडी विनाकारण जीवावर बेतत असतात. तरीही ओव्हर टेकर्सना यात काहीच कशी लाज-शरम वाटत नाही? ईश्वरप्राती करून ब्रह्मानंद प्राप्तीसाठी अशी तातडी, असे साधकांना ओव्हर टेक करणारे महाभाग मात्र क्वचितच दृष्टीस पडतात. कारण या आध्यात्मिक, भक्तिमार्गावर चालणारा लंगडालुळा होत नाही तर त्याचा थेट पुनर्जन्मच होतो, एक खरा भला माणूस म्हणूनच!

समजा, आपली एखादी मूल्यवान वस्तू घरातच कुठेतरी हरवली. ती जोपर्यंत आपल्या दृष्टीस पडत नाही तोपर्यंत मनास चैन पडेल तर शप्पथ! ती शोधण्यासाठी आपण एका पाठोपाठ एक साधन वापरतो. कधी काठीने, कधी झाडूने ओढून, ढकलून वा चाचपडून बघतो. तर कधी विजेरीचा प्रकाशझोत टाकून डोळे फाडफाडून पाहतो. ती वस्तू सांपडत नाही, तोवर शोध घेणे आपण थांबवित नाही. सहज एखादे सद्गृहस्थ यावे आणि वस्तू उचलून तुम्ही शोधत आहात ते हेच का? असे उच्चारताच आपली उत्सुकता शिगेला पोहोचते. झटकन ती वस्तू हातात घेऊन तिला निरखून बघतो आणि मोठ्या आनंदाने खड्या आवाज म्हणतो, अहो, ती हीच माझी अमोलक वस्तू! मी हीलाच शोधत होतो. असे म्हणून आपण पूर्वीप्रमाणे ती वस्तू शोधत राहाल का? नाही. आधी त्या दात्या व्यक्तीस अनेक नमस्कार घालतो, धन्यवाद देऊन त्याचे स्तुतीपाठ गातो. आजीवन ऋणी व उपकृत राहण्याचे बोलून दाखवितो व वचनबद्ध होतो. आपण परत त्याच वस्तूचा शोध सुरूच ठेवला, तर लोक आपल्याला नक्कीच मूर्ख ठरवतील. मात्र त्या वस्तूची स्वच्छता, सुरक्षा, सुशोभन, कलाकुसर, काळजी आदी वेळोंवेळी चालवित असतो. अगदी असेच ब्रह्मानंद व इश्वरप्राप्तीस केल्या जाणाऱ्या भक्ती वा पुजापाठाचे आहे. विचारा, कसे? तर आपण पुजापाठ कशासाठी करतो? त्यामागील उद्देश साफ-स्पष्ट असावा लागतो. ईश्वरप्राप्ती करून ब्रह्मानंद मिळवावे, असा उद्देश असेल तर वरील दृष्टांत तंतोतंत लागू पडतो. त्यासाठीच आपण पुजापाठ, जप, तप, योगयाग करत असतो. परंतु अनेक शोध शोधांती एखादा ब्रह्मवेत्ता सद्गुरू मिळाला आणि त्याने ब्रह्मदर्शन घडवून दिले. तर मग परत तसलेच पुजापाठ करत बसणे योग्य राहील का? नाही ना! म्हणून मग केवळ ईश्वरास आमरण प्रसन्न ठेवण्यासाठी सद्गुरूच्या आदेश व वचनांचे पालन करत त्यालाच आपण सदैव हसतमुख ठेवण्याचा प्रयत्न करतो. हे सर्वश्रूत आहे, हीच खऱ्या ब्रह्मानंदप्राप्त साधकांची परंपरा आहे. आपण जिथून सुरूवात केली होती, तिथे थांबून सांगावेसे वाटते, की ओव्हर टेक करणारास पुढे जाऊ द्या, पण मागे पडणाराने अजिबात चालाखी करू नये. पुढे जाणारास पुढ्यात घेऊन त्याच्या यशस्वीतेबद्दल सहकार्य द्यावे, यामुळे काय होईल? तर वाईट प्रसंग वा अप्रिय घटना अजिबात उद्भवणार नाही. वादंग वा हिंसाचाराला आपणच ब्रेक लावू शकाल, एवढे मात्र निश्चित! यात तुम्हाला जो आनंद मिळेल; तो खरोखरच ब्रह्मानंद असेल..!

# कोटीच्या कोटी उड्डाणे!

वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलनाचा पुन्हा एकदा विक्रम झाला आहे. यावेळचा विक्रम अधिक महत्त्वाचा; याचे कारण एप्रिल महिन्यातील जीएसटीचे संकलन दोन लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडून पुढे गेले आहे. सात वर्षांपूर्वी जीएसटी लागू झाला तेव्हा पहिल्या वर्षी सरासरी मासिक संकलन ८२ हजार कोटी रुपये होते. यावरून जीएसटीने किती मोठी मजल मारली आहे, याचा अंदाज यावा. निवडणुकांचा माहोल असल्याने एप्रिलमधील विक्रमी जीएसटी संकलन सत्ताधाऱ्यांना सुखावणारे आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या प्रतिक्रियेवरूनही याचा अंदाज येतो. त्यांच्या मते, या जीएसटी संकलनामध्ये अर्थव्यवस्थेच्या सक्षमतेचे प्रतिबिंब पडले आहे. हे काही प्रमाणात खरे आहे. याचे कारण, इतक्या मोठ्या प्रमाणात व्यवहार, खरेदी-विक्री, उत्पादन, आर्थिक देव-घेव झाल्याशिवाय करसंकलन वाढणार नाही.

जीएसटीचे एकूण संकलन वाढणे, याचाच अर्थ त्यातील राज्यांच्या वाट्याला येणारी रक्कमही वाढणे. त्यामुळे, या आकड्यांवर राज्येही खूष असणार, यात शंका नाही. मात्र, केवळ या मोठ्या आकड्यावर भाळून देशातील करप्रणाली, एकूण अर्थव्यवस्था आणि जीएसटीचे वर्तमान व भविष्य यांच्याबाबत नि:शंक व आश्वस्त राहायचे का, याचा विचार होणे आवश्यक आहे. मुळात, सध्या जीएसटीचे चार प्रकारचे दर आहेत. पाच, १२, १८ आणि २८ टक्के. ही करआकारणी कितीतरी जास्त आहे. विजेवर चालणाऱ्या अनेक ग्राहकोपयोगी वस्तू १८ टक्क्यांच्या वर्गवारीत येतात. तसे म्हटले तर पाचनंतरचे तीनही टप्पे हे वस्तू आणि सेवांवर भरपूर कर आकारणी करणारे आहेत. केंद्र सरकारने केवळ तिजोरीतील जीएसटीचा ओघ कसा वाढतो आहे; यावर समाधान न मानता जीएसटी करांची फेररचना करण्याची गरज आहे.

संपूर्ण देशाची एकच बाजारपेठ आणि दुहेरी कर आकारणीपासून सुटका, असे जीएसटीचे मूलभूत तत्त्व असले तरी देशाच्या अर्थकारणाचा गाडा प्रामुख्याने ज्या पेट्रोलियम पदार्थांच्या किंमतींवर चालतो; ते या करजाळ्यात येतच नाहीत. आज पेट्रोल किंवा डिझेल यांची आयात किंमत आणि ग्राहकांना मोजावी लागणारी किंमत यांच्यात जी प्रचंड तफावत आहे; त्याचे मुख्य कारण त्यावरचे कर हेच आहे. केंद्र आणि सर्व राज्य सरकारांना या करांतून मोठा निधी मिळत असतो. पेट्रोल व डिझेल यांच्यावरील करसंकलनात या सरकारच्या काळात पाचशे टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. मग सरकारने जी इच्छाशक्ती जीएसटी आणताना दाखविली; तीच इच्छाशक्ती दाखवून पेट्रोल, डिझेल, इंधनवायू यांनाही जीएसटीत का आणू नये? अर्थमंत्री सीतारामन या ‘पेट्रोल व डिझेल जीएसटीमध्ये आणण्यास आपला विरोध नाही...’ असे म्हणत असतात. पण सर्व राज्यांचे यावर एकमत होणार नाही, हे त्यांना माहीत आहे. याचे कारण, हा उत्पन्नाचा मोठाच स्रोत आहे. मात्र, पेट्रोल व डिझेल जीएसटीमध्ये आले तर चलनवाढीला आळा बसून एकूण अर्थकारणाला किती मोठी चालना मिळू शकेल, याचे अनेक अभ्यास प्रकाशित झाले आहेत. जीएसटीचे जाळे असे विस्तारले तर ग्राहकोपयोगी छोट्या छोट्या वस्तूंवरचा जीएसटीचा बोजाही सरकारला कमी करता येईल.

अप्रत्यक्ष कर हा नेहमीच ‘सब घोडे बारा टक्के’ असे म्हणत समाजातील दुर्बळांची क्रयशक्ती तुलनेने कमी करीत असतो. महिन्याला २० हजार रुपये मिळविणाऱ्यांनी साबण किंवा डिटर्जंटवर १२ टक्के जीएसटी भरणे आणि दोन लाख मिळवणाऱ्यांनीही तितकाच भरणे; यातून या अप्रत्यक्ष कररचनेतील विषमतेचे स्वरूप लक्षात येईल. मात्र, अशी विषमता दूर करण्यासाठी प्रत्यक्ष कराची - विशेषत: प्राप्तिकराची - वसुली प्रामाणिकपणे आणि जाळे विस्तृत करून करावी लागते. आपली करप्रणाली यात सातत्याने कमी पडते आहे. प्रत्यक्ष करांची वसुली अर्थकारणाच्या प्रमाणात होत नसल्याने जीएसटीचा प्रचंड बोजा आज सामान्य ग्राहकांवर पडतो आहे. सरकार सक्तीने करीत असलेली धान्यखरेदी (लेव्ही) हीदेखील साजरी करायची गोष्ट आहे; असा विपरीत संस्कार इथल्या शेतकऱ्यांवर होता. तशीच गत जीएसटीच्या वाढत्या आकड्यांनी आनंदी होणाऱ्या सामान्य नागरिकांची होऊ नये. जीएसटी व्यवस्थेत दुहेरी कर आकारणी पूर्णपणे संपलेली नाही. तसेच, व्यावसायिक, उद्योजकांना जीएसटीचा परतावाही वेळेत व वेगाने मिळतोच, असे नाही. अनेकदा त्यांचा व्यवहार सफल होत नाही; कर मात्र आधीच कापून गेलेला असतो. जीएसटी ही फार मोठी कर सुधारणा आहे, यात शंकाच नाही. सात वर्षांपूर्वी ती करून मोदी सरकारने धाडसी, आवश्यक पाऊल टाकले. पण गेल्या काही काळात जीएसटीच्या वाढत्या संकलनावरच सरकार खूष दिसते आहे. तिजोरीत इतका प्रचंड पैसा नियमित व बिनबोभाट येऊन पडणे कोणत्या राज्यकर्त्यांना आवडणार नाही? मात्र, आता जीएसटीचे जाळे विस्तारणे, काही वस्तूंवरील करांची टक्केवारी कमी करणे आणि करसंकलन व परताव्यात अधिक पारदर्शकता आणणे गरजेचे आहे. करसंकलनाचे विक्रम होणे याचा अर्थ करपद्धती निर्दोष, सर्वजनहिताची झाली, असे नाही.

# मॉर्स सॅम्युअल फिन्ली ब्रीज!

अमेरिकेच्या सरकारने या शोधाचे हक्क विकत घेण्यास नकार दिल्यावर मॉर्स यांनी स्वतःची कंपनी स्थापन केली. तारायंत्राचा प्रसार लवकरच झपाट्याने वाढला व बहुतेक देशांनी त्याचा वापर करण्यास सुरुवात केली. तथापि लगेचच मॉर्स यांच्यावर त्यांचे भागीदार व प्रतिस्पर्धी संशोधक यांनी शोधाच्या अधिकाराबाबत दावे लावले. अतिशय खर्चिक न्यायालयीन खटल्यांचा दीर्घ मालिकेनंतर इ.स.१८५४ साली अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने मॉर्स यांचा एकस्व अधिकार मान्य केला. अटलांटिक महासागराच्या दोन्ही किनाऱ्यांवर तारायंत्र संदेशवहन जसजसे वाढत गेले, तसतशी मॉर्स यांची कीर्ती व संपत्तीही वाढत गेली. वृद्धापकाळात त्यांनी परोपकाराच्या उदात्त हेतूने ते स्वतः संस्थापक व विश्वस्त असलेल्या व्हॅसर कॉलेजला, त्यांच्या येल कॉलेज या मातृसंस्थेला, धार्मिक संस्थांना व संघटनांना तसेच गरीब कलाकारांना सढळपणे आर्थिक मदत केली. त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ त्यांना अनेक बहुमान मिळाले. मॉर्स यांच्या स्वतःच्या आयुष्यातच तारायंत्रामुळे जगाचे स्वरूप कितीतरी बदलले.

मॉर्स- मोर्स सॅम्युअल फिन्ली ब्रीझ हे अमेरिकन चित्रकार व विद्युत चुंबकीय तारायंत्राचे जनक होत. मॉर्स यांचा जन्म दि.२७ एप्रिल १७७१ रोजी चार्ल्सटाऊन- मॅसॅचूसेट्स येथे झाला. त्यांचे शिक्षण अँडोव्हर येथील फिलिप्स कॅडमीत व पुढे येल कॉलेज येथे झाले. विद्यार्थी दशेतच त्याकाळी फारसे आकलन न झालेल्या विद्युत या विषयावरील व्याख्यानामुळे त्यांना गोडी निर्माण झाली. त्याच वेळी त्यांना लघू व्यक्तिचित्रे काढण्याचा छंद जडला. तथापि त्यांच्या वडिलांना त्यांचा हा छंद पसंत नव्हता.

### पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ डॉ.योगेश क्षीरसागरांच्या कार्यकर्ता मेळाव्यात दिसली ताकद

# बुद्धिभेद करणाऱ्यापासून सावध रहा ;सतर्क राहून आपापलं बुथ मजबूत करा-पंकजाताई

## बीडची सुज्ञ जनता पंकजाताईंच्या पाठिशी खंबीर-डॉ.योगेश क्षीरसागर







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । प्रतिनिधी

मी विकासाच्या मुद्यावर निवडणूकीचा प्रचार करत आहे. यापूर्वी पालकमंत्री असताना माझ्या विरोधात असलेल्या लोकांना कधीही मी त्रास दिला नाही, जातीपातीचे राजकारण कधीच केले नाही. विकास निधी सर्वांना दिला. कोणालाही दुखावले नाही. मात्र इतके सगळे चांगले असतानाही या निवडणूकीत काही जण जनतेचा बुध्दीभेद करु लागलेत , त्यांच्यापासून दूर रहा. विरोधक कोणताही मुद्दा नसल्याने आम्ही संविधान बदलणार अशी टिका आमच्यावर करत आहेत. बीड जिल्ह्यातील जनता सुज्ञ आहे ती विरोधकांच्या खोट्या प्रचाराला थारा देणार नाही. आम्ही सर्व समाजाचे आम्ही प्रतिनिधित्व करतो म्हणूनच मी विजयी होणार आहे, प्रत्येक कार्यकर्त्याने आपला बूथ सांभाळावा. डोळ्यात तेल घालून सतर्क राहून काम करावं. आपलं मताचे सत्पात्री दान मला द्यावे असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले. तर बीडची सुज्ञ जनता पंकजाताईंच्या पाठिशी खंबीरपणे उभी असल्याचे डॉ. योगेश क्षीरसागर यांनी म्हटलं आहे.

राष्ट्रवादीचे बीड विधानसभेचे नेते डॉ.योगेश व डॉ.सारिका क्षीरसागर यांच्या वतीने आयोजित विजयी संकल्प कार्यकर्ता मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. डॉ. योगेश क्षीरसागर,डॉ. सारिका क्षीरसागर,जनार्धन तुपे, प्रज्ञा खोसरे, कल्याण आखाडे, बाप्पासाहेब घुगे, सुनील झोडगे, सुधीर काकडे, भास्कर जाधव यांच्यासह नगर पालकेचे सभापती, नगरसेवक, विविध सेवा सहकारी सोसायटीचे पदाधिकारी उपस्थित होते.कार्यकर्त्यांशी संवाद साधताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या,मी पालकमंत्री असताना जिल्ह्यासाठी राष्ट्रीय महामार्गासह राज्य मार्गाचे कामे केली. यासह अनेक योजना राबवल्या, हे काम जनतेला दिसते.त्यामुळेच पाच वर्ष मी सत्तेसोबत नसतानाही माझी जनता माझ्यासोबत राहिली. ही निवडणूक बीड जिल्ह्याच्या विकासासाठी आहे, सर्व समाजाला पुढे घेऊन जाण्यासाठी आहे. सन्मानाचा विजय मिळवून देण्यासाठी तुमचे योगदान या निवडणुकीत मला द्या. आपला विकासाचा विचार गावागावात पोहचला आहे. लोक आता मतदानासाठी उत्साहित आहेत. आजपर्यंतच्या राजकारणात आम्ही कधी कुणाचा द्वेष केला नाही, विकास आणि आपल्या जिल्ह्यातील सर्व समाज घटकांच्या हितासाठी काम केलं आहे. जिल्ह्यात मी ठिकठिकाणी मतदारांना मते मागत असताना त्यांचा प्रतिसाद उत्स्फूर्त आहे. साडेतीन खासदारांच्या मागे उभे राहायचे की ३५० पेक्षा जास्त खासदार निवडून येणाऱ्या पक्षासोबत रहायचे हे जनतेला चांगले कळते. मुंडे साहेबाचे अधुरे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपल्याला येत्या ४ तारखेला विजयी सभा घ्यायची आहे. निवडणूक ही देशाची आहे. देशाचे नेतृत्व पुन्हा एकदा लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्याकडे जाणार आहे, त्यामुळे या निवडणुकीत आपल्या जिल्ह्याचा सर्वांगीण विकास समोर ठेवून मतदारांनी इतर कोणत्याही अपप्रचाराला बळी न पडता भाजपला मतदान करावे. तुमच्या गावात तुमची किती मते आहेत हे या निवडणुकीत दाखवून देण्याची संधी कार्यकर्त्यांना आहे. जातीपातीचे राजकारण करणाऱ्यापासून दूर रहा. मला प्रचंड मतांनी विजयी करून दिल्लीला पाठवा असे आवाहन केले. महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मताधिक्य वाढवण्यासाठी बूथ मजबूत करण्याचे काम करावे, लवकरच मोदींजींची बीडला सभा होत आहे.या सभेला लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन त्यांनी केले.जिल्हयात सात लाख हेक्टर जमीन कोरडवाहू आहे ही सर्व जमीन सिंचनाखाली आणण्यासाठी आपण पंकजाताई याना विजयी करा. महायुती म्हणून आम्ही सर्वजण एकदिलाने काम करत आहोत. जिल्ह्यात विकासाचे, सिंचनाचे अनेक प्रकल्प राबवत आहोत, राजकारणात मी सक्रिय झालो तेव्हा बीड जिल्ह्यात कधीच जातपात नव्हती. सर्व जातीचे लोक बीडमधून खासदार झाले, हा बीड जिल्ह्याचा सर्वधर्मसमभावाचा राजकीय इतिहास आहे. इथे जात पाहून नव्हे तर व्यक्तीचे कर्तृत्व पाहून उमेदवाराला निवडून देणारी जनता आहे. कोणी कोणाच्या जातीत जन्माला यावं हे आपल्या हातात नसत. त्यामुळे जातिवादाला महत्व देऊ नका. देश विकासासोबत जिल्ह्याचा विकास करण्यासाठी ही निवडणूक आहे. पंकजाताई मुंडे यांना खासदार म्हणून मोदींजींच्या पाठीशी उभे करा.पंकजाताई आपल्या रूपाने ही लक्ष्मी बीड जिल्ह्यात यावी. आम्हाला सारे जण विचारतात की, तुम्ही खूप मनावर घेऊन प्रचार करतात, आम्ही सांगतो की, आम्हाला पंकजाताई यांना केंद्रात मंत्री म्हणून काम करताना पहायचे आहे, त्यामुळे आम्ही या निवडणुकीत ताईंसाठी १०० टक्के काम करणार आहो. पंकजाताई म्हणजे विश्वसनीय आणि आदरणीय व्यक्तिमत्त्व आहेत. क्षीरसागर परिवार आणि मुंडे परिवारांचे नाते घट्ट राहिलेले आहे. तसेच सर्व कार्यकर्ते आज आपल्या परिवारात आहेत. हे सर्व कार्यकर्ते तळागाळातील आहेत. सामान्य माणसांशी यांची नाळ जुळलेली आहे त्यामुळे पंकजाताई यांचा या निवडणुकीत विजय निश्चित आहे.आम्ही सर्वांनी मनावर घेतले आहे, पंकजाताई यांचा विजय निश्चित आहे. लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या हाती देशाचे हित आहे आणि त्यांचे हात मजबूत करण्यासाठी आपल्याला पंकजाताई मुंडे यांना निवडून आणायचे आहे.मोदींजींनी पंकजाताई मुंडे यांना केवळ खासदार करण्यासाठी उमेदवारी दिली नाही तर त्यांना केंद्रात मंत्रिपद मिळणार आहे त्यामुळे बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी पंकजाताई यांना विक्रमी मतांनी विजयी करायचे आहे. पालकमंत्री असताना पंकजाताई यांनी ग्रामीण रस्ते तसेंच इतर विकासाच्या योजना बीड जिल्ह्यात आणल्या,त्यांच्या कार्यकाळात बीड जिल्ह्यात कोट्यवधी रुपयांची विकास कामे झाली हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात आताही बीड जिल्ह्यात विकास कामाचा वेग कायम आहे, समोरच्या उमेदवाराचे कोणतेही काम नाही,त्यामुळे ते काय काम करणार हे दिसून येते. आपला विकास कोण करू शकते हे बीडच्या जनतेला चांगले कळत म्हणूनच पंकजाताई मुंडे यांना विजयी करायचे आहे. पंकताईंनी कधीही जातीभेद केला नाही. त्यामुळे बीडची जनता येत्या १३ तारखेला पंकजाताई यांना विक्रमी मतदान करेल आणि ४ जून रोजी पंकजाताई मुंडे या प्रचंड मतांनी विजयी झालेल्या असतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# विश्वधर्मी प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड यांना मानद डी.लिट.प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई । प्रतिनिधी



यूएसए, उटाह येथील ब्रिघम यंग युनिव्हर्सिटी (बीवाययू) तर्फे विश्वधर्मी प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड यांना मानद डी.लिट.प्रदान पुणे, दि. २६ एप्रिल : शिक्षण आणि मानवतेच्या दीर्घकाळ समर्पित सेवेसाठी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांना यूएसए, उटाह येथील ब्रिघम यंग युनिव्हर्सिटीतर्फे (बीवाययू) मानद डी.लिट. पदवी प्रदान करून सन्मानित करण्यात आले. बीवाययूचा २०२४ बॅचच्या दीक्षांत समारोह गुरूवारी २५ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी बीवाययूचे अध्यक्ष डॉ. सी.शेन रीस, एल्डर डी टॉड क्रिस्टोफरसन, एल्डर रोनाल्ड रासबँड, एल्डर गेरिट गाँग, रॉन गनेल, रिचर्ड नेल्सन, किंग हुसेन, डॉ. अशोक जोशी आणि बोर्डाचे इतर विश्वस्त सदस्य उपस्थित होते. डीलिट पदवी प्रदान करताना अध्यक्ष सी शेन रीस यांनी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उत्तुंग कार्याचे कौतूक केले. तसेच आंतरधर्मीय संवादातून विश्वशांती स्थापनेला देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचाचे कौतुक केले. डीलिट स्वीकारल्यानंतर विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, शिक्षणात वैश्विक मूल्याधिष्ठीत शिक्षणाचा अंतर्भाव करणे गरजेचे आहे. त्यातूनच वसुधैव कुटुम्ब कम आणि विश्वशांतीचे वातावरण निर्माण होण्यास मदत होईल. मन, बुद्धी, आत्मा आणि शरीर हे निसर्ग तत्व आहे. आज शरीर आणि बुद्धी यावर सखोल संशोधन होत आहे. परंतू आत्मा आणि मनाच्या शिक्षणाचा विचार झालेला दिसत नाही. जगात शांती नांदायची असेल तर अध्यात्माबरोबरच मन आणि आत्म्याचा अभ्यास होणे गरजचे आहे. अमेरिकेतील आघाडीचे विद्यापीठ बीवायू व एमआयटी डब्ल्यूपीयू यांच्यात सहकार्य निर्माण व्हावे, तसेच जगात शांती संस्कृती प्रस्थापित करण्यासाठी मूल्याधारित शिक्षण प्रणालीच्या संकल्पनेला चालना देण्यासाठी जगातील इतर विद्यापीठांचाही समावेश होईल. अशी डॉ. कराड यांनी आशा आहे. माझ्या जीवनावर महाराष्ट्रातील संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यासारख्या थोर तत्वज्ञ संताचा आणि डॉ. अल्बर्ट आइनस्टाईन सारख्या शास्त्रज्ञांचा चिरस्थायी प्रभाव पडला आहे. माझी मोठी बहिण प्रयागअक्का कराड यांचा ही प्रभाव आहे. त्याच प्रमाणे स्वामी विवेकानंद यांच्याकडून मिळालेल्या प्रेरणेमुळे जीवनाला नवी दिशा मिळाली आहे. असे उद्गार डॉ. विश्वनाथ कराड यांनी या प्रसंगी काढले. या समारंभात बीवायूच्या १५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये विविध विषयातील पदवी पदव्युत्तर आणि डॉक्टरेट पदव्यांचा समावेश होता. या दीक्षांत समारोहात सुमारे २५ हजार नागरिक उपस्थित होते.

# पप्पू शिंदे यांची एम पी डी ए मधून ८ दिवसात मुक्तता

## ॲड.विशाल कदम यांनी केलेला युक्तिवाद यशस्वी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । प्रतिनिधी

मराठा आंदोलक पप्पू शिंदे यांना लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर एम.पी.डी.ए कायदा १९८१ अंतर्गत दि. २४ एप्रिल रोजी जिल्हादंडाधिकारी यांच्या आदेशाने मध्यवर्ती कारागृह हर्सूल छत्रपती संभाजी नगर येथे स्थानबद्ध करण्यात आले होते. सदरील आदेश पारित करीत असताना कायद्यामधील सर्व प्रक्रिया पूर्ण झाली नसल्यामुळे त्याविरुद्ध ड. विशाल कदम यांच्या मार्फत आक्षेप दाखल करण्यात आला होता. त्यावर जिल्हाधिकारी यांनी सुनावणी घेऊन स्थानबद्ध पप्पू शिंदे यांना तातडीने मुक्त करण्याचे आदेश पारित केले आहेत, यामुळे मराठा आंदोलकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

सविस्तर वृत्त असे की, बीड शहरामध्ये मराठा आंदोलनाच्या दरम्यान मोठ्या प्रमाणावर जाळपोळ झाली, आमदारांच्या घरासह सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यालयांना आग लावण्यात आली. त्यामध्ये पप्पू शिंदे यांना मुख्य आरोपी करण्यात आले होते. त्या प्रकरणात त्यांना अटक देखील झाली व रीतसर न्यायालयाने त्यांना जामीन देखील दिला मात्र त्या गुन्ह्यांचा आधार घेऊन व दोन गोपनीय साक्षीदारांच्या जबाबामुळे बीड शहर पोलीस स्टेशन यांच्यामार्फत एम पी डी ए १९८१ कायद्याअंतर्गत कारवाई करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्ताव जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी १९ एप्रिल २०२४ रोजी मंजूर केला. त्यानुसार २४ एप्रिल २०२४ रोजी पप्पू शिंदे यांना कारवाई करून स्थानबद्ध करण्यात आले. सदरील कायद्यामधील कलम ३(३) अनुसार स्थानाबद्दल प्राधिकार्याने तातडीने सदरील प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरी करिता पाठवणे बंधनकारक आहे, व तो प्रस्ताव १२ दिवसांच्या आत मंजूर करणे राज्य शासनाला बंधनकारक आहे असे न झाल्यास सदरील आदेश अमलात राहणार नाही अशी तरतूद कायद्यामध्ये आहे.स्थानबद्ध प्राधिकार्यांकडून प्रस्ताव २३ एप्रिल २०२४ रोजी राज्य शासनाकडे पाठविण्यात आला, मात्र त्याला मंजुरी मिळाली नाही. कायद्यातील तरतुदींचा आधार घेऊन उच्च न्यायालयातील ड विशाल कदम यांनी याबाबत स्थानाबद्द प्राधिकारी म्हणजेच जिल्हादंडाधिकारी यांच्या न्यायालयात आक्षेप दाखल केला. पप्पू शिंदे यांचे वर केलेली कार्यवाही ही नियमबाह्य असून कायद्यातील प्रक्रियेचे उल्लंघन करणारी आहे, तसेच त्यामुळे भारतीय संविधानातील कलम २१ व २२ (२) चे उल्लंघन करणारी आहे; त्यामुळे त्यांना तातडीने मुक्त करण्याचे आदेश पारित करण्याची मागणी करण्यात आली होती. रीतसर प्रस्तुत प्रकरणावर सुनावणी होऊन स्थानबद्ध प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी पप्पू शिंदे यांना मुक्त करण्याचे आदेश पारित केले आहेत. मराठा आंदोलनातील प्रमुख नेत्यांपैकी पप्पू शिंदे हे एक प्रमुख असल्याने मराठा आंदोलकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.बीड जिल्ह्यात आजवर शेकडो कारवाया एम पी डी ए कायद्याअंतर्गत झाल्या, त्यामध्ये अनेक महिने सदरील इसमांना स्थानबद्ध राहावे लागले आहे व अनेक अजून देखील कारागृहातच आहेत. पप्पू शिंदे यांच्या प्रकरणात मात्र गंभीर कायदेशीर व संविधानिक बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्याने त्यांची सुटका तांत्रिक बाबीमुळे झाली असून यामुळे प्रशासनाला धडा मिळाला आहे असेच म्हणावे लागेल.

# न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे त्या प्रकरणात सरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

जिंतूर । प्रतिनिधी

जिंतूर तालुक्यातील मारवाडी येथील विलास गणेशराव देशमुख यांनी जिंतूर न्यायालयात अनंता बन्सीधर देशमुख, पवन प्रसादराव देशमुख आणि मदन प्रभाकर देशमुख यांचे विरुद्ध त्यांनी संगणमत करून ग्रामपंचायतचे पाईपलाईन फोडण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून त्यांचा भाऊ कल्याण गणेशराव देशमुख यांचा खून करून पुरावा नष्ट केल्याबद्दल फौजदारी व्यवहार संहिता कलम १५६ (३) नुसार ॲड. मनोज सारडा यांच्यामार्फत प्रकरण दाखल केले सदर प्रकरणात माननीय न्यायाधीश श्रीमती वेदवती आद्य देशपांडे यांनी पोलीस स्टेशन बोरी यांना प्रकरणात भादवी ३०२ व इतर कलमा अन्वये संबंधितावर गुन्हा दाखल करून अहवाल सादर करावा असे आदेश दिले आहेत.

घटनेची थोडक्यात माहिती अशी की, दिनांक १८ नोव्हेंबर २०२३ रोजी मयत कल्याण देशमुख यांनी मारवाडी येथील ग्रामपंचायत ची पाईपलाईन फोडली या कारणावरून सरपंच अनंता देशमुख व त्यांचे सहकारी पवन आणि मदन यांचे सोबत त्यांचा वास झाला त्यावेळी सरपंच व त्यांच्या सहकाऱ्यांनी कल्याण तुझी पाहून घेतो असे धमकावले. त्यानंतर दिनांक १९ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी नऊ वाजता फिर्यादी त्याच्या शेतात जात असताना आरोपी त्यांना गावातील मंदिराजवळ भेटले आणि कल्याणला समजावून सांगा की आमच्या नादाला लागू नको नाहीतर परिणाम वाईट होतील असे म्हणून कल्याणच्या घराच्या दिशेने गेले. फिर्यादी दुपारी शेतातून परत आला असता त्यास त्याच्या आईने सांगितले की कल्याणच्या शेजारी जाणाऱ्या महिलेने आरोपी यांनी घरात मारहाण केली आहे त्यावरून फिर्यादी यांनी आरोपी यांना त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधून तुम्ही कल्याणला का मारले असे विचारणा केली असता त्यांनी केवळ आम्ही त्याला थापड बुक्क्या मारल्या असे सांगितले त्यामुळे फिर्यादी व त्याची आई कल्याणच्या घराकडे गेले असता त्या ठिकाणी तो जाण्यापूर्वीच बोरी पोलीस स्टेशनचे फौजदार खिल्लारे साहेब व कर्मचारी आलेले होते त्या ठिकाणी आल्यानंतर फिर्यादी यास त्याच्या भावाची बॉडी घराच्या छताला स्कार्फ बांधून लटकवलेली दिसली तसेच जमिनीवर रक्त सांडेल दिसले. त्या ठिकाणी पोलिसांनी घटनास्थळाचे फोटो घेतले आणि प्रेत खाली घेतले. ज्या ठिकाणी घटना घडली त्या ठिकाणी खो सरलीमध्ये कोणतेही स्टूल अथवा उंच चढण्याइतपत वस्तू नव्हती. मताची पत्नी माहेरी मौजे पुंगळा येथे गेलेली असल्यामुळे फिर्यादीने सदरची घटना वनिता यांना कळवली. त्यानंतर प्रेत सरकार दवाखाना बोर येथे आणले गेले. बोरी येथे दवाखान्यात प्रेत आल्यानंतर आरोपी यांनी संगणमत करून फिर्यादीचा भाव कल्याण याने मराठा आरक्षणाच्या निर्णयाबाबत शासन उशीर करत असल्यामुळे जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या लढ्याला पाठिंबा म्हणून आत्महत्या केल्याची वावडी उठवली. त्या रात्री फिर्यादी पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यात गेला असता पोलिसांनी त्यास पोलीस स्टेशनमध्ये बसून ठेवले आणि त्यांची फिर्याद दिनांक २० नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी लिहून घेतली सदरची फिर्या देत असताना आरोपी अनंता देशमुख यांनी त्याच्या मोबाईलवरून फिर्यादीला त्याच्या मोबाईलवर संपर्क साधून गुन्हा दाखल करू नका आपण मिटवून घेऊ अशी विनंती केली सदरचे मोबाईल रेकॉर्डिंग सहाय्यक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर व पोलिसांना दिली परंतु पोलिसांनी त्याबाबत कोणतीही गंभीर कार्यवाही केली नाही. तसेच तुमच्या तक्रारीप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे असे सांगून फिर्यादीस प्रेत गावाकडे घेऊन जावा अंत्यविधी ऊर्का असे म्हणून घरी जाण्यास सांगितले. त्यानंतर धार्मिक विधी पूर्ण झाल्यावर फिर्यादी पोलीस स्टेशनला आले असतात त्यांना माहिती मिळाली की सरला गाडेकर या पोलीस अधिकाऱ्याने आरोपी यांच्यासोबत संगणमत करून कोणताही गुन्हा दाखल केला नाही त्यामुळे फिर्यादी याने पाठपुरावा करून पोलीस उपाधीक्षक जिंतूर, पोलीस अधीक्षक परभणी आणि विशेष पोलीस महानिरीक्षक नांदेड यांचे कडे लेखी तक्रार दिली परंतु त्यानंतर देखील गुन्हा दाखल होत नसल्यामुळे शेवटी त्यांना न्याय दंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय जिंतूर येथे तक्रार दाखल करावी लागली. सदरची तक्रार दाखल करत असताना मयतावर झालेल्या पोस्टमार्टम अहवालात संशयास्पद पुराव्याची माहिती, आरोपी यांच्यासोबत मोबाईल मध्ये झालेले संभाषण व इतर सर्व पुरावे दाखल करण्यात आले. फिर्यादी यांचे तर्फे ॲड. मनोज सारडा यांचा युक्तिवाद आणि प्रकरणात दाखल प्रथम दर्शनी सर्व पुराव्यांचा विचार करून न्यायाधीश श्रीमती वेदवती आद्य देशपांडे यांनी आरोपी यांचे विरुद्ध भादवी ३०२ व इतर कलमा अन्वये गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिनांक ०३/०५/२०२४ रोजी दिले आहेत.

प्रकरणाचा क्रमांक

फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक ४४/२०२४

विशेष म्हणजे प्रस्तुत प्रकरणात सरला गाडेकर यांना तत्कालीन पोलीस अधीक्षक यांनी सखोल चौकशी करून गुन्हा दाखल करण्याबाबत तोंडी आदेश दिलेले होते असे असताना त्यांनी प्रस्तुत प्रकरणात आरोपी यांच्या राजकीय व आर्थिक दबावापोटी गुन्हा दाखल केला नाही. त्यामुळे प्रकरणाची चौकशी सीआयडीमार्फत होऊन दिनांक १९ नोव्हेंबर २०२३ ते आज पर्यंत सरला गाडेकर यांच्या मोबाईल मधून आरोपी व त्यांच्या नातेवाईकांसोबत झालेल्या संभाषणाची सीडीआर, सीसीटीव्ही कॅमेरा मधील फुटेज तपासून आरोपींना वाचवण्यासाठी पुरावा नष्ट करण्यास मदत केल्याबद्दल त्यांचेवर देखील गुन्हा दाखल करून न्याय द्यावा असे फिर्यादी यांनी वार्ताहर यांना बोलताना सांगितले आहे. जर वरिष्ठांनी संबंधित फौजदाराविरुद्ध कार्यवाही न केल्यास लवकरच माननीय उच्च न्यायालय खंडपीठ संभाजीनगर येथे याचिका दाखल करणार असल्याचे सांगितले आहे.

# समाजसेवी श्री सुधीर गवळी यांना राज्यस्तरीय महात्मा फुले सत्यशोधक पुरस्कार प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अमरावती । प्रतिनिधी**

सध्याच्या स्थितीत धर्मांध शक्तींना खतपाणी घातले जात आहे.अशा वेळी सुधीर प्रकाशनाच्या माध्यमातून श्री सुधीर गवळी हे गेल्या चार दशकापासून फुले-शाहू- आंबेडकरांचे सत्यशोधकीय विचार गतिशील करीत आहेत. त्यांचे प्रकाशन क्षेत्रातील कार्य वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी उपयुक्त ठरत आहे.या सत्यशोधकीय व्यक्तिमत्त्वाने फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारधारेवर आधारित अनेक पुस्तकं प्रकाशित करून सत्यशोधकीय विचारांचा प्रचार व प्रसार केलेला.असे विचार समाजभूषण प्रा.श्रीकृष्ण बनसोड यांनी व्यक्त केले.

ते वऱ्हाड विकास व कै.मैनाबाई बाबारावजी बुंदेले स्मृती प्रतिष्ठान अमरावती तर्फे वर्धा येथे नुकताच संपन्न झालेल्या समाजसेवी श्री सुधीर गवळी यांना दिलेल्या महात्मा फुले

राज्यस्तरीय सत्याशोधक पुरस्कार सोहळ्यात अध्यक्षपदावरून विचार व्यक्त करीत होते.पुरस्कार सोहळ्याचे अध्यक्ष प्रा.श्रीकृष्ण बनसोड, प्रमुख अतिथी श्री वसंतराव भडके (माजी लेखाधिकारी), उत्कर्ष गवळी,विनय डहाके, माळी महासंघाचे अध्यक्ष सुधाकर मेहरे,वासुदेवराव कडूकर, निळकंठराव राऊत, अशोकराव कडू,संजय भगत,भरत चौधरी, मोहन पोहनकर,विशाल हजारे,कोठेकर,रोहिणी पाटील,किरण कडू होते.अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते महात्मा फुले,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण झाले.याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना समाजसेवी श्री सुधीर गवळी यांनी , सत्यशोधक पुरस्कार बहाल केल्याबद्दल वऱ्हाड विकासचे व कै.मैनाबाई बुंदेले प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. अरुण बुंदेले यांचे आभार मानले.पुरोगामी चळवळ वृद्धिंगत करण्याचे कार्य प्रा.श्रीकृष्ण बनसोड करीत असल्याचे प्रतिपादन केले.समाजसेवी श्री सुधीर गवळी यांनी फुले-शाहू -आंबेडकर-विचारधारेवर आधारित ४७५ पुस्तक व संदर्भ ग्रंथ प्रकाशित केली आहेत. पहिल्या पिढीत त्यांचे वडील श्री शालिग्राम गवळी यांनी फुले-शाहू -आंबेडकरांच्या विचारांची पुस्तके घरोघरी देऊन पुरोगामी विचारांचा प्रचार व प्रसार केला.वर्धा येथील बोरगाव मेघे येथून त्यांनी फुले -शाहू-आंबेडकरांच्या विचारांचा प्रचार व प्रसार पुस्तक प्रकाशनातून संपूर्ण भारतभर आजपर्यंत केलेला आहे व करीत आहेत.प्रकाशनाच्या क्षेत्रातील कार्य लक्षात घेऊन विविध संस्थांनी पुरस्कार देऊन श्री सुधीर गवळी यांना सन्मानित केले आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री वसंतराव भडके,संचालन उत्कर्ष गवळी तर आभार अशोक कडू यांनी मानले.




## शहीद हजरत टिपू सुलतान यांच्या पुण्यतिथी निमित्त चखच् उमरखेड पक्षाच्या वतीने बस स्टैंड वर थंड पाणी बॉटल चे वाटप करण्यात आले



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम रजा**

आज शेर ए मैसूर हजरत शहीद टीपू सुलतान यांच्या स्मुर्ती दिनानिमित्त चखच् उमरखेड पक्षाच्या वतीने उमरखेड येथील बस स्टँड वर थंड पाणी बॉटल चे वाटप करण्यात आले.
या वेळी चखच् जिलाध्यक्ष सै. इरफान, तालुका अध्यक्ष शहाबुद्दीन कुरेशी, शहराध्यक्ष सै. अफसर, सिद्दीक राज,वजाहत मुजावर, शाहरुख पठान, मुजम्मील जनाब,आसिफ, ईमरान,फराज, नदीम राज, फारूक भाई. उपस्थित होते.

# नांदगव्हाण घाटात बसला सिमेंट मिक्सर ट्रकची धडक
## नांदेड नागपूर बस मधील ३१ प्रवासीचा जीव वाचला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**महागाव । सय्यद रहीम रजा**

महागाव तालुक्यातील नांदगव्हाण घाट मध्ये सकाळी ११ वाजता नांदेड ते नागपूर एसटी बस क्रमांक चक२०इङ२६०७ नांदगव्हाण घाटात सिमेंट मिक्सर ट्रक क्रमांकचक१२टथ७६६५ मागून जोरदार धडक दिली या घटनेने बस ही पुलावर लटकली याच ठिकाणी रस्त्याचे काम सुरू असल्याने जेसीबी च्या माध्यमातून बसमधील प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. काँक्रीट मिक्सिंग करणाऱ्या वाहनाने बसला मागून जोरदार धडक दिली ही धडक इतकी जोरदार



होती की बस पुढे समोर ढकलल्या जाऊन काही अंतरावर असलेल्या पुलाच्या कठड्यावर जाऊन आढळली आढळल्याने बाजूला असलेला खोल दरीत कोसळण्याचा प्रकार रोखला गेला अपघात घडतात वाहनधारकांनी आजच्या अपघातात तर स्वतःची कवडीची ही पर्वा न करता प्रवाशांना कसं सुरक्षित ठेवता येईल याचीच काळजी घेतली वारंवार या ठिकाणी अपघात होत आहेत याच ठिकाणी अपघात ग्रस्त ट्रक अडथळा म्हणून आजही उभा आहे हा ट्रक हटविणे गरजेचे आहे मदत कार्य सुरू असून वाहतूक सुरळीत करण्याचे कार्य पोलीस प्रशासन करीत आहेत.

१) महत्त्वाचे म्हणजे सध्या गर्दीचा हंगाम सुरू आहे

२)प्रवाशांची अपेक्षा असते की जागा भेटलीच पाहिजे तेव्हा ते बस पॉईंटला लावू देत नाहीत. तर जागा ठेवण्यासाठी चालत्या बस मागे धावतात.

३) अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे वाहक खिडकी बाहेर हात काढून सुचवत असताना सुद्धा डावीकडे बस टर्न होणार म्हटलं की तेवढ्यातच बाईकस्वर येऊन बसला टेकतात. याकडे प्रवाशांनी कोणती जीवित हानी घडू नये स्वतःची काळजी घेणे आवश्यक आहे.

# अक्षय तृतीयेचा मुहूर्त: 'बालविवाह' रोखण्यासाठी शासकीय यंत्रणा सतर्क

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

मे महिन्यात दि.१० रोजी 'अक्षय तृतीया' या मुहूर्तावर अनेक विवाह होत असतात. त्यात बालविवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापि,बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा, तालुका व गाव पातळीवरील शासकीय यंत्रणांना सतर्क राहण्याचे सुचित करण्यात आले आहे, तसेच नागरिकांनाही अशा विवाहाची माहिती गोपनियरित्या शासनापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


जिल्ह्यात बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा कृती दलाची स्थापना करण्यात आली असून बालविवाह निर्मूलन कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. गेल्या वर्षभरात (दि.१ एप्रिल २०२३ पासून) जिल्ह्यात आतापर्यंत ७५ बालविवाह रोखण्यात कृती दलाला यश आले आहे. त्यातील तीन प्रकरणांमध्ये गुन्हा ही दाखल करण्यात आला आहे. राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोग, नवी दिल्ली यांच्या निर्देशान्वये जिल्ह्यात बालविवाह निर्मूलनाकरीता जनजागृतीसाठी कार्यक्रम घेण्यात येत आहेत. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ च्या कायद्याची जाणीव व्हावी यासाठी तसेच बाल वयात बाल हक्कांपासून वंचित राहू नये म्हणून सर्व संबंधित यंत्रणांच्या समन्वयाने कार्यवाही करण्याचे कामकाज सुरु आहे. बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ या कायद्यान्वये मुलीचे वय १८ वर्षे तर मुलाचे वय २१ वर्षाच्या आत असतांना विवाह केला तर असा विवाह बालविवाह म्हणून गणला जातो. त्यासाठी १ लाख रुपये आर्थिक दंड व २ वर्षे सक्त मजूरीची शिक्षा किंवा दोन्ही असे शिक्षेचे प्रावधान आहे.ग्रामपंचायतीसाठी ग्रामसेवक तर नागरी भागासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) हे बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून शासनाने घोषित केले आहे. आपल्या परिसरात वा गावात बालविवाह होत असल्याचे निदर्शनास आल्यास आपण संबंधितांकडे माहिती देऊ शकता. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाते.जिल्ह्यात कोठेही बालविवाह होत असतील किंवा होऊ घातले असतील तर नागरिकांनी अशी माहिती चाईल्ड हेल्प लाईन १०९८ किंवा ११२ या क्रमांकावर द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल. बालविवाहाबाबतची माहिती जवळचे पोलीस स्टेशन, ग्रामपंचायत कार्यालय, पंचायत समिती, बाल कल्याण समिती, जिल्हा बालसंरक्षण कक्ष तसेच जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांचे कार्यालय येथेही देता येईल. नागरिकांनी आपल्या जवळपास होणारे विवाह जर बालविवाह असतील तर त्याची माहिती द्यावी असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आर. एन. चिमंद्रे यांनी केले आहे.

# निवडणुकीदरम्यान 'डीप फेक' रोखण्यासाठी कारवाई करण्याचे शासनाचे आदेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीदरम्यान डीप फेक व्हिडिओज, क्लिप्स, फोटो किंवा इतर प्रकारचा कंटेंट तयार करून तो समाजमाध्यमे / डिजिटल माध्यमांवरून प्रसारित करण्यात येत आहे. या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी संबंधितांवर कडक कारवाई शासनामार्फत करण्यात येणार आहे. यासंदर्भात पोलीस महासंचालकांना सूचना देण्यात आल्या आहेत.



फोटोशॉप, मशीन लर्निंग (एमएल) किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) यांसारख्या विविध तंत्रांचा गैरवापर करून डीप फेक व्हिडिओज, क्लिप्स, फोटो किंवा इतर प्रकारचा कंटेंट तयार करण्यात येतो. निवडणुकीदरम्यान या तंत्राचा गैरवापर हा चिंतेचा विषय आहे. एखादा उमेदवार, राजकीय पक्ष किंवा निवडणुकीच्या मुद्द्याविषयी चुकीचे व्हिडिओ, ऑडिओ, फोटो तयार करण्यात येतात किंवा खऱ्या फोटो, ऑडिओ, व्हिडिओमध्ये फेरफार करून ते चुकीच्या पद्धतीने प्रसारित करण्यात येतात. असे गैरपद्धतीने तयार केलेले डीप फेक व्हिडिओज, क्लिप्स किंवा फोटो खरे असल्यासारखे भासतात आणि त्यामुळे संबंधिताविषयी गैरसमज किंवा बदनामी होते. निवडणूक काळात अशा प्रकरणांमध्ये वाढ होत असून यावर आळा घालण्यासाठी तसेच स्वच्छ आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रिया होण्याच्या दृष्टीने 'डीप फेक' कंटेंट तयार करणाऱ्या आणि प्रसारित करणाऱ्या समाजकंटकांवर कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात यावी, अशा सूचना शासनाने दिल्या आहेत. राज्य शासनामार्फत पोलीस महासंचालकांना यासंदर्भात सूचना देण्यात आल्या असून पोलीस खात्यामार्फत यासंदर्भात कार्यवाही करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगानेही विपर्यस्त माहिती रोखण्यासंदर्भात त्यांच्या मार्गदर्शिकेमध्ये सूचना दिल्या आहेत.

# लोकसभा निवडणुकीत उमेदवाराचे प्रचार दौरे सुरू,श्रीमती रक्षा नितीन खडसे भाजपा उमेदवार याचा दौरा मलकापूर येथे सुरू

## रक्षा नितीन खडसे याचे तिसऱ्यांदा विजया कडे पाऊल;हजोरोच्या संख्येने सहभागी झाले मतदाते






■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

१३ मे रोजी होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवारांचे प्रचार दौरे सुरू आहेत.रावेर लोकसभा मतदार संघातून महायुती भाजपाचया उमेदवार रक्षा खडसे यांचा प्रचार दौरा दीं.३ मे ला मलकापूर विधासभा मतदार संघात आयोजित करण्यात आला होता.मोठ्या जोशात हा दौरा पार पडला फेरो ऑईलटेक प्रा ली कंपनी दासरखेड मधील एम आयडीसी या ठिकाणा सकाळी १०वाजता विजय संकल्प मेकावाचे आयोजक कंपनीचे सर्वासर्वे बोहरा हे होते या ठिकाणी आलेल्या सर्वांना माहाप्रसाचे वितरण करण्यात आले त्यानंतर बाजीप्रभू नगर येथून शिवाजी महाराज पुतळा व हनुमान मंदीरात पूजा करून या प्रचार रलीची सुरुवात करण्यात आली.मलकापूर येथील प्रचार दौऱ्या दरम्यान त्यांच्या सोबत भाजपा प्रदेश उपाध्यक्ष चैनसुख संचेती तसेच भाजपा व मित्र पक्षचे अनेक मोठे नेते व हजारोच्या संख्येने कार्यकर्ते व नागरिक त सहभागी झाले होते.यावेळी जागोजागी थांबून त्यांनी लोकांच्या गाठीभेटी घेतल्या ही प्रचार रॅली शहरातून फिरताना रक्षा खडसेंना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत होता.शहरातील शिवाजीनगर येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला रक्षा खडसेंनी व भाजपा प्रदेश उपाध्यक्ष चैनसुख संचेती यांनी माल्यारपन करीत अभिवादन केले.व महाराष्ट्र न्यूज १८ शी बोलताना जनतेला भाजपला निवडून देण्याचे आवाहन करीत आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या


हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904